ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित, ज्युनिअर कॉलेज, ऑफ व्होकेशनल एज्युकेशन लासुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे या संस्थेस सासवड, ता. पुरंदर, जि.पुणे येथे स्थलांतर करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांकः व्हीओसी-२०१६/प्र.क्र.९/व्यशि-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १२ सप्टेंबर, २०१७

संदर्भ :

१) संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक ४/व्हिओसी/२२०३/२०१५-१६/१३०, दिनांक ३०/१२/२०१५ व ४/व्हिओसी /२२०३ /२०१६-१७/६७, दिनांक १२/७/२०१६.

प्रस्तावना :

ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित, ज्युनिअर कॉलेज, ऑफ व्होकेशनल एज्युकेशन लासुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे या संस्थेत १) ॲटो इंजिनिअरींग टेक्निशियन, २) मार्केटिंग ॲण्ड सेल्समनशिप, व ३) बिल्डिंग मेन्टेनन्स या विषयाची प्रत्येकी १ तुकडी सुरु करण्यास शासन निर्णय क्र. व्हिओसी ११९६/(११४/९६)/व्यशि-४, दि. १७/७/१९९७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु विद्यार्थ्यांचा कमी प्रतिसाद असल्यामुळे उपरोक्त संस्था सासवड, ता.पुरंदर, जि. पुणे येथे स्थलांतरित करण्याबाबत संचालक (व्यशि) यांनी संदर्भाधिन पत्रान्वये विनंती केली आहे. त्यानुसार ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित, ज्युनिअर कॉलेज, ऑफ व्होकेशनल एज्युकेशन लासुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे ही संस्था शिक्षक/शिक्षकेतर पदासह सासवड, ता.पुरंदर, जि. पुणे येथे स्थलांतरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय-

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार, ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित, ज्युनिअर कॉलेज, ऑफ व्होकेशनल एज्युकेशन लासुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे या संस्थेमधील १) ॲटो इंजिनिअरींग टेक्निशियन, २) मार्केटिंग ॲण्ड सेल्समनशिप, व ३) बिल्डिंग मेन्टेनन्स या विषयाची प्रत्येकी १ तुकडीस

शिक्षक/शिक्षकेतर पदासह सासवड, ता.पुरंदर, जि. पुणे येथे स्थलांतरीत करण्यास खालील अटींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. संस्था ज्या ठिकाणाहून स्थलांतरीत होणार आहे त्या ठिकाणी विद्यार्थांची शैक्षणक गैरसोय होणार नाही.
२. स्थलांतरित करावयाच्या संस्थेमधील कोणत्याही कर्मचाऱ्यांस, व्यवस्थापानास कमी करता येणार नाही.
३. संस्था स्थलांतरित ठिकाणी आवश्यक सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा संस्था व्यवस्थापन उपलब्ध करून देईल.

सदर व्यवसाय अभ्यासक्रम स्थलांतरणामुळे शासनावर कुठल्याही स्वरूपाच्या आर्थिक भाराचा तसेच पदनिर्मितीचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१२१३०४४८०५०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas Laxman Dhakane

Digitally signed by Kailas Laxman Dhakane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD and ED, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6283d0b58cf739d67ca64d0949864 94b972b39cf4df46464c9bd30ae8293d9de, cn=Kailas Laxman Dhakane
Date: 2017.09.12 12:55:37 +05'30'

(कैलास ढाकणे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.
२) मा. राज्यमंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.
३) मा. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
४) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे स्वीय सहायक.
५) उप सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) संचालक , व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई-१
७) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत.)

८) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, पुणे (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत.)

९) प्राचार्य, ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित, ज्युनिअर कॉलेज, ऑफ व्होकेशनल एज्युकेशन लासुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत.)

१०) निवड नस्ती (व्यशि-४).